# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’, विद्यार्थ्यांनी अनुभवले बहीण-भावाच्या नात्याचे हळवे विश्व

**29 August 2026**

विद्यापीठाच्या कॅम्पस फिल्म क्लबचा माजिद माजिदींच्या चित्रपटाने विद्यार्थी भारावले

**नांदेड :** रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्याचा स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील **कॅम्पस फिल्म क्लब** तर्फे सुप्रसिद्ध **इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी** यांच्या **‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’** या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले.

**फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया** आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे आयोजन झाल्याने प्रदर्शनाला विशेष औचित्य लाभले.


एका गरीब कुटुंबातील लहान बहीण आणि भावाच्या नात्याभोवती ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’ ची कथा आकार घेते. बहिणीचे बूट हरवल्यानंतर तिला होणारा त्रास आणि तिच्यासाठी नवे बूट मिळविण्याची लहान भावाची धडपड या साध्याशा कथासूत्रातून माजिदी यांनी मानवी नात्यांचे विलक्षण भावविश्व उभे केले आहे. स्वतःच्या गरजा आणि अडचणी बाजूला ठेवून बहिणीसाठी धावणाऱ्या भावाची निरागस धडपड पाहताना अनेक प्रसंगांत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.


चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी दर्शनही घडते. आर्थिक अभाव आणि संघर्ष असतानाही कुटुंबातील माणसे प्रामाणिकपणा, नैतिकता, परस्परांविषयीची काळजी आणि माणुसकी कशी जपतात, हे चित्रपट अत्यंत सहजपणे अधोरेखित करतो. गरिबीचे भांडवल न करता तिच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्यांची श्रीमंती दाखविणे, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य असल्याची भावना चर्चेदरम्यान व्यक्त करण्यात आली.

चित्रपटाच्या प्रारंभी प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’ ची ओळख करून दिली. इराणी सिनेमाची वैशिष्ट्ये, दिग्दर्शक माजिद माजिदी यांची चित्रभाषा तसेच साध्या कथेतून वैश्विक मानवी मूल्ये मांडण्याची इराणी सिनेमाची परंपरा याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

चित्रपटानंतर झालेल्या चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. **बहीण-भावाचे नाते, बालमनातील निरागसता, गरिबी, कुटुंबव्यवस्था, त्याग आणि मानवी संवेदना यांसह चित्रपटाच्या साध्या परंतु परिणामकारक मांडणीवर** विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

यावेळी माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक, डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. सचिन नरंगले, भाषा संकुलातील प्रा. डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. योगिनी सातारकर यांच्यासह विविध संकुलांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जनतेचा आवाज • सत्याचा ध्यास • लोकशाहीचा प्रहरी

दैनिक प्रजाशाहीचा आवाज

• निर्भीड • निष्पक्ष • निर्भय

सत्यासाठी सदैव तत्पर

वर्ष : 03 | अंक : 60 | शुक्रवार, 30 ऑगस्ट 2026 | पाने : 08 | किंमत : ₹ 2.00 | RNI : MAHMAR/2024/89502

# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन', विद्यार्थ्यांनी अनुभवले बहीण-भावाच्या नात्याचे हळवे विश्व

**विद्यापीठाच्या कॅम्पस फिल्म क्लबचा माजिद माजिदींच्या चित्रपटाने विद्यार्थी भारावले**




**नांदेड** : रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्यच स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्ध्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले.



फेडेरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे आयोजन झाल्याने प्रदर्शनाला विशेष औचित्य लाभले.




एका गरीब कुटुंबातील लहान बहीण आणि भावाच्या नात्याभोवती 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन'ची कथा आकार घेते. बहीणीचे बूट हरवलेल्या तिला होणारा त्रास आणि तिच्यासाठी नवे बूट मिळविण्याची लहान भावाची धडपड या साध्यास्या कथसूत्रातून माजिदी यांनी मानवी नात्यांचे विलक्षण भावविश्व उभे केले आहे. स्वत.च्या गरजा आणि अडचणी बाजूला ठेवून बहीणीसाठी धावणाऱ्या भावाची निरागस धडपड पाहताना अनेक प्रसंगांत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी दर्शनही घडते. आर्थिक अभाव आणि संघर्ष असतानाही कुटुंबातील माणसे प्रामाणिकपणा, नैतिकता, परस्पराविषयीची काळजी आणि माणुसकी कशी जपतातवे, हे चित्रपट अत्यंत सहजपणे अधोरेखित करतो. गरिबीचे भांवल न करता तिच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्यांची श्रीमंती दाखविणे, हे या चित्रपटांचे वैशिष्ट्य असल्याची भावना चर्चेदरम्यान व्यक्त करण्यात आली.

चित्रपटाच्या प्रारंभी प्रा. डॉ. राजेंद्र गोनारकर यांनी 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' ची ओळख करून दिली. इराणी सिनेमची वैशिट्ये, दिग्दर्शक माजिद माजिदी यांची चित्रभाषा तसेच साध्या कथेतून वैश्विक मानवी मूल्ये मांडण्याची इराणी सिनेमाची परंपरा याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.








चित्रपटानंतर झालेल्या चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. बहीण-भावाचे नाते, बालमनातील निरागसता, गरिबी, कुटुंबव्यवस्था, त्याग आणि मानवी संवेदना यांसह चित्रपटाच्या साध्या परंतु परिणामकारक मांडणीवर विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

**▶ यावेळी उपस्थित मान्यवर**

यावेळी माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक, डॉ. राजेंद्र गोनारकर, डॉ. सचिन नरंगले, भाषा संकुलातील प्रा. डॉ. शैलजा वाडेकर, डॉ. योगिनी सातारकर यांच्यासह विविध संकुलांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिनेमा केवळ करमणूक नाही, तो आपल्याला माणूस बनवतो.
– कॅम्पस फिल्म क्लब

---

नांदेड, रविवार, दि.३० ऑगस्ट २०२६

# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन', विद्यार्थ्यांनी अनुभवले बहीण-भावाच्या नात्याचे हळवे विश्व

**नांदेड** - रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्याचा स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले.

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे आयोजन झाल्याने प्रदर्शनाला विशेष औचित्य लाभले.

एका गरीब कुटुंबातील लहान बहीण आणि भावाच्या नात्याभोवती 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन'ची कथा आकार घेते. बहिणीचे बूट हरवल्यानंतर तिला होणारा त्रास आणि तिच्यासाठी नवे बूट मिळविण्याची लहान भावाची धडपड या साध्याशा कथासूत्रातून माजिदी यांनी मानवी नात्यांचे विलक्षण भावविश्व उभे केले आहे. स्वत:च्या गरजा आणि अडचणी बाजूला ठेवून बहिणीसाठी धावणाऱ्या भावाची निरागस धडपड पाहताना अनेक प्रसंगांत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी दर्शनही घडते. आर्थिक अभाव आणि संघर्ष असतानाही कुटुंबातील माणसे प्रामाणिकपणा, नैतिकता, परस्पराविषयीची काळजी आणि माणुसकी कशी जपतात, हे चित्रपट अत्यंत सहजपणे अधोरेखित करतो. गरिबीचे भांडवल न करता तिच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्यांची श्रीमंती दाखविणे, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य असल्याची भावना चर्चेदरम्यान व्यक्त करण्यात आली.

लोकमत

# ‘रक्षाबंधन : विद्यार्थ्यांनी अनुभवले बहीण-भाऊ नात्याचे हळवे विश्व’

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर ‘स्वारातीम’ विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’, या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्यातील प्रेम, त्याग, निरागसता आणि संवेदनशीलता तरलपणे मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थी भारावून गेले.

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि विद्यापीठाच्या, माध्यमशास्त्र संकुलातील कॅम्पस फिल्म क्लबच्या विद्यमाने चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या चित्रपटाचे आयोजन झाल्याने त्याला विशेष औचित्य लाभले. गरीब कुटुंबातील बहीण-भावाच्या नात्याभोवती चित्रपटाची कथा गुंफण्यात आली आहे. बहिणीचे बूट हरवल्यानंतर तिची होणारी अडचण आणि तिच्यासाठी नवे बूट मिळविण्यासाठी भावाची सुरू असलेली धडपड या साध्या कथासूत्रातून दिग्दर्शक माजिदी यांनी मानवी नात्यांचे समृद्ध भावविश्व उभे केले आहे.

स्वतःच्या अडचणी बाजूला ठेवून बहिणीसाठी प्रयत्न करणाऱ्या भावाची निरागस धडपड विद्यार्थ्यांच्या मनाला भावली. चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी चित्रण करताना गरिबी, कौटुंबिक संघर्ष आणि आर्थिक अभावाच्या पार्श्वभूमीवरही माणुसकी, प्रामाणिकपणा आणि नात्यांतील जिव्हाळा कसा जपला जातो, हे मांडण्यात आले आहे. यावेळी प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. सुहास पाठक, डॉ. सचिन नरंगले, प्रा. डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. योगिनी सातारकर, विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Nanded Gramin
Page No. 5 Aug 30, 2026
Powered by: erelego.com


दैनिक युवक आधार
तरुणांचा बुलंद आवाज
मुख्यसंपादक : भारती संतोष आमले - 9220403509

# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’, विद्यार्थ्यांनी अनुभवले बहीण–भावाच्या नात्याचे हळवे विश्व

## विद्यापीठाच्या कॅम्पस फिल्म क्लबचा माजिद माजिदींच्या चित्रपटाने विद्यार्थी भारावले

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्याचा स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’ या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले.




फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे आयोजन झाल्याने प्रदर्शनाला विशेष औचित्य लाभले.एका गरीब कुटुंबातील लहान बहीण आणि भावाच्या नात्याभोवती ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’ची कथा आकार घेते. बहिणीचे बूट हरवल्यानंतर तिला होणारा त्रास आणि तिच्यासाठी नवे बूट मिळविण्याची लहान भावाची धडपड या साध्याशा कथासूत्रातून माजिदी यांनी मानवी नात्यांचे विलक्षण भावविश्व उभे केले आहे. स्वतःच्या गरजा आणि अडचणी बाजूला ठेवून बहिणीसाठी धावणाऱ्या भावाची निरागस धडपड पाहताना अनेक प्रसंगांत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी दर्शनही घडते. आर्थिक अभाव आणि संघर्ष असतानाही कुटुंबातील माणसे प्रामाणिकपणा, नैतिकता, परस्परांविषयीची काळजी आणि माणुसकी कशी जपतात, हे चित्रपट अत्यंत सहजपणे अधोरेखित करतो. गरिबीचे भांडवल न करता तिच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्यांची श्रीमंती दाखविणे, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य असल्याची भावना चर्चेदरम्यान व्यक्त करण्यात आली.

चित्रपटाच्या प्रारंभी प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी ‘चिल्ड्रन्स ऑफ हेवन’ ची ओळख करून दिली. इराणी सिनेमाची वैशिष्ट्ये, दिग्दर्शक माजिद माजिदी यांची चित्रभाषा तसेच साध्या कथेतून वैश्विक मानवी मूल्ये मांडण्याची इराणी सिनेमाची परंपरा याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

चित्रपटानंतर झालेल्या चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. बहीण-भावाचे नाते, बालमनातील निरागसता, गरिबी, कुटुंबव्यवस्था, त्याग आणि मानवी संवेदना यांसह चित्रपटाच्या साध्या परंतु परिणामकारक मांडणीवर विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

यावेळी माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक, डॉ. राजेंद्र गोणारकर,डॉ. सचिन नरंगले, भाषा संकुलातील प्रा. डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. योगिनी सातारकर यांच्यासह विविध संकुलांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

August 30, 2026 | Page No: 8 | epaper.yuvakaadhar.in
Powered By EpaperOnline.In | 9504040304

# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन', विद्यार्थ्यांनी अनुभवले बहीण-भावाच्या नात्याचे हळवे विश्व

नांदेड - रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्याचा स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या म ाध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले.

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे आयोजन झाल्याने प्रदर्शनाला विशेष औचित्य लाभले.

एका गरीब कुटुंबातील लहान बहीण आणि भावाच्या नात्याभोवती 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन'ची कथा आकार घेते. बहिणीचे बूट हरवल्यानंतर तिला होणारा त्रास आणि तिच्यासाठी नवे बूट मिळविण्याची लहान भावाची धडपड या साध्याशा कथासूत्रातून माजिदी यांनी मानवी नात्यांचे विलक्षण भावविश्व उभे केले आहे. स्वतःच्या गरजा आणि अडचणी बाजूला ठेवून बहिणीसाठी धावणाऱ्या भावाची निरागस धडपड पाहताना अनेक प्रसंगांत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी दर्शनही घडते. आर्थिक अभाव आणि संघर्ष असतानाही कुटुंबातील माणसे प्रामाणिकपणा, नैतिकता, परस्परांविषयीची काळजी आणि माणुसकी कशी जपतात, हे चित्रपट अत्यंत सहजपणे अधोरेखित करतो. गरिबीचे भांडवल न करता तिच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्यांची श्रीमंती दाखविणे, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य असल्याची भावना चर्चे दरम्यान व्यक्त करण्यात आली.

वाचकमंच ३००८२६०३

# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' चित्रपटाचा अनुभव

**प्रतिनिधी ■ नांदेड**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्याचा स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले.

बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले. फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि स्वारातीम विद्यापीठातील म ाध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे आयोजन झाल्याने प्रदर्शनाला विशेष औचित्य लाभले.

एका गरीब कुटुंबातील लहान बहीण आणि भावाच्या नात्याभोवती 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन'ची कथा आकार घेते. बहिणीचे बूट हरवल्यानंतर तिला होणारा त्रास आणि तिच्यासाठी नवे बूट मिळविण्याची लहान भावाची धडपड या साध्याशा कथासूत्रातून माजिदी यांनी मानवी नात्यांचे विलक्षण भावविश्व उभे केले आहे. स्वतःच्या गरजा आणि अडचणी बाजूला ठेवून बहिणीसाठी धावणाऱ्या भावाची निरागस धडपड पाहताना अनेक प्रसंगांत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी दर्शनही घडते. आर्थिक अभाव आणि संघर्ष असतानाही कुटुंबातील माणसे प्रामाणिकपणा, नैतिकता, परस्परांविषयीची काळजी आणि माणुसकी कशी जपतात, हे चित्रपट अत्यंत सहजपणे अधोरेखित करतो. गरिबीचे भांडवल न करता तिच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्यांची श्रीमंती दाखविणे, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य असल्याची भावना चर्चे दरम्यान व्यक्त करण्यात आली.

चित्रपटाच्या प्रारंभी प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन'ची ओळख करून दिली. इराणी सिनेमाची वैशिष्ट्ये, दिग्दर्शक माजिद माजिदी यांची चित्रभाषा तसेच साध्या कथेतून वैश्विक मानवी मूल्ये मांडण्याची इराणी सिनेमाची परंपरा याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक, डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. सचिन नरंगले, भाषा संकुलातील प्रा. डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. योगिनी सातारकर यांच्यासह विविध संकुलांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रजावाणी ३१९८२५०५

गोदातीर समाचार

epaper.godateer.com
31 Aug 2026 - Page 3

# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन', विद्यार्थ्यांनी अनुभवले बहीण-भावाच्या नात्याचे हळवे विश्व

## विद्यापीठाच्या कॅम्पस फिल्म क्लबचा माजिद माजिदींच्या चित्रपटाने विद्यार्थी भारावले

**नांदेड (प्रतिनिधी)**– रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्याचा स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले.

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या दुसऱ्याच दिवशी बहीण-भावाच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे आयोजन झाल्याने प्रदर्शनाला विशेष औचित्य लाभले.

एका गरीब कुटुंबातील लहान बहीण आणि भावाच्या नात्याभोवती 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन'ची कथा आकार घेते. बहिणीचे बुट हरवल्यानंतर तिला होणारा त्रास आणि तिच्यासाठी नवे बुट मिळविण्याची लहान भावाची धडपड या साध्याशा कथासूत्रातून माजिदी यांनी मानवी नात्यांचे विलक्षण भावविश्व उभे केले आहे. स्वतःच्या गरजा




आणि अडचणी बाजूला ठेवून बहिणीसाठी धावणाऱ्या भावाची निरागस धडपड पाहताना अनेक प्रसंगांत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

चित्रपटातून इराणी समाजजीवनाचे वास्तवदर्शी दर्शनही घडते. आर्थिक अभाव आणि संघर्ष असतानाही कुटुंबातील माणसे प्रामाणिकपणा, नैतिकता, परस्परांविषयीची काळजी आणि माणुसकी कशी जपतात, हे चित्रपट अत्यंत सहजपणे अधोरेखित करतो. गरिबीचे भांडवल न करता तिच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्यांची श्रीमंती दाखविणे, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य असल्याची भावना चर्चे दरम्यान व्यक्त करण्यात आली.

चित्रपटाच्या प्रारंभी प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' ची ओळख करून दिली. इराणी सिनेमाची वैशिष्ट्ये, दिग्दर्शक माजिद माजिदी यांची चित्रभाषा तसेच साध्या कथेतून वैश्विक मानवी मूल्ये मांडण्याची इराणी सिनेमाची परंपरा याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

चित्रपटानंतर झालेल्या चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. बहीण-भावाचे नाते, बालमनातील निरागसता, गरिबी, कुटुंबव्यवस्था, त्याग आणि मानवी संवेदना यांसह चित्रपटाच्या साध्या परंतु परिणामकारक मांडणीवर विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

यावेळी माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक, डॉ. राजेंद्र गोणारकर,डॉ. सचिन नरंगले, भाषा संकुलातील प्रा. डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. योगिनी सातारकर यांच्यासह विविध संकुलांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

# विद्यापीठाच्या कॅम्पस फिल्म क्लबचा माजिद माजिदींच्या चित्रपटाने विद्यार्थी भारावले

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्वत्र बहीण-भावाच्या नात्याचा स्नेह साजरा होत असताना, याच नात्यातील प्रेम, त्याग आणि निरागस ओलावा विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पस फिल्म क्लबतर्फे सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी यांच्या 'चिल्ड्रन्स ऑफ हेवन' या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्यात आले. बहीण-भावाच्या नात्याची अत्यंत तरल कथा मांडणाऱ्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांना भारावून टाकले. फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या कॅम्पस फिल्म क्लबच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

देशोन्नती ३१०८२६०६